# ‘बर्ड्स ऑफ गोवा’च्या निमित्ताने एव्हि टुरिझमची सुरुवात

प्रतिनिधी
पणजी

बर्ड्स ऑफ गोवा हे पुस्तक जगभरातील उच्चस्तरीय पर्यटक आणि पक्षीप्रेमींना राज्यातील पक्ष्यांच्या वसाहतीच्या ठिकाणी येण्यास आकर्षित करेल. पक्षी निरीक्षकांच्या जगातील नकाशावर गोव्याचा समावेश या निमित्ताने होईल अशी अपेक्षा आहे, असे मत राज्याचे पर्यटनमंत्री दिलीप परूळेकर यांनी व्यक्त केले.

बिक्रम गरेवाल आणि सॅव्हियो फोन्सेका यांनी तयार केलेल्या ‘बर्ड्स ऑफ गोवा’ या पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. यावेळी गोवा टुरिझम डेव्हलेपमेंट कॉर्पोरेशनचे चेअरमन तथा आमदार नीलेश काब्राल, मुख्य सचिव आर. के. श्रीवास्तव, आयएफएस प्रिन्सिपल अजय सक्सेना, आयएफएस प्रिन्सिपल अमेय अभ्यंकर, पर्यटन खात्याचे संचालक निखिल देसाई, बिक्रम गरेवाल, साव्हियो फोन्सेका आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुस्तकाच्या माध्यमातून पक्षीनिरीक्षणाची सफर

बर्ड्स ऑफ गोवा या पुस्तकात गोवा राज्यात सापडणाऱ्या पक्ष्यांच्या ४०० जाती आणि वैशिष्ट्यपूर्ण उपजातींचे ४८० पूर्णपणे रंगीत फोटो देण्यात आले आहेत. गोव्याच्या विविध भागातून हे फोटो काढण्यात आले आहेत. त्याचबरोबर त्या फोटोसह त्या पक्ष्याची माहिती आणि तो पक्षी आढळणारे ठिकाण याचा उल्लेख आवर्जुन केला आहे. या पुस्तकात गोव्याचा नकाशा आणि पक्षीनिरीक्षणाच्या ठिकाणांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यात चोर्लाघाट, करमळी तलाव, सांतईनेज, पिळर्ण, आल्त–पर्वरी, बेती, खोतीगाव अभयारण्य, शिरोडा, शिरगाव, मडगाव, आरोसी बीच, बोंडला अभयारण्य, तांबडी सुर्ला यांचा समावेश आहे.

परूळेकर व काब्राल यांनी बर्ड इन्स्टिट्यूट ऑफ गोवा, बर्ड्स ऑफ गोवा लेखक आणि प्रत्यक्ष ठिकाणचे अविस्मरणीय फोटो देणाऱ्या छायाचित्रकारांचे अभिनंदन करून कौतुक केले आहे.




**पणजी : ‘बर्डस ऑफ गोवा’ पुस्तकाचे प्रकाशन करताना पर्यटनमंत्री दिलीप परूळेकर. बाजूला आमदार नीलेश काब्राल, विक्रम ग्रेवाल, निखिल देसाई, अजय सक्सेना व अन्य.**

उमेश बाणस्तारकर

गोव्यामध्ये पक्षीतज्ज्ञ आणि पक्षी निरीक्षकांसाठी योग्य वातावरण तयार केले जात असून त्यात पक्ष्यांचा अभ्यास करणाऱ्यांचा तसेच छंद म्हणून जोपासणाऱ्याचा विचार करण्यात येईल, असे मत गोवा टुरिझम डेव्हलमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष नीलेश काब्राल यांनी व्यक्त केले.

गोवा टुरिझमने नुकताच पणजी येथील बर्ड इन्स्टिट्यूट ऑफ गोवा या संस्थेशी करार केला असून ती राज्यातील पक्षी विषयक कामात रस घेणारी स्वायत्त संस्था आहे. या पुस्तकाचे लिखाण बिक्रम गरेवाल यांनी केले असून साव्हियो फोन्सेका यांनी पुस्तकासाठी १९० फोटो, वसाहती, नकाशे, वितरण आणि गोव्यातील पक्षी निरीक्षणाचा कालावधी यांची माहिती दिली आहे. पुस्तकातील ७४ फोटो अवघ्या १६ वर्षाच्या एडनने काढले आहेत.